## नियमावली क्र. १७

## प्रकरण दोन मधील कलम ४ (ब) (सतरा )

इतर उपयुक्त माहिती

मुंबईतील नागरिकांना देण्यात येणा-या सेवांचा स्तर सुधारण्याकरिता महानगरपालिकेच्या कर्मचा-यांच्या क्षमता वर्धीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून ना.प्र.सं व सं. केंद्र ही संस्था बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचा-यांकरिता, तांत्रिक, प्रशासकीय, संगणक व व्यावहारिक कौशल्य यामधील प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करते.

ना.प्र.सं.व सं.केंद्र ही संस्था महानगरपालिका कर्मचा-यांना त्यांच्या कार्यक्षेत्रासंबंधीची अद्ययावत माहिती व तंत्रज्ञान प्राप्त व्हावे याकरिता राष्ट्रीय स्तरावरील विविध नामांकित संस्थांकडून आयोजित केल्या जाणा-या निवासी/अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रमांना पाठविते.

महाराष्ट्र राज्यातील इतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व त्यांचे अधिकारी यांजबरोबर माहिती व तंत्रज्ञानाचे अनुभव आदानप्रदान करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने पवई येथे एम.सी.एम.सी.आर (MCGM Centre for Municipal Capacity Building & Research) ही राज्यस्तरीय प्रशिक्षण संस्था स्थापन केली आहे. इतर महानगरपालिका कर्मचा-यांमधील कौशल्य व ज्ञानात भर पाडणे हे सदर संस्थेचे उद्दिष्ट आहे. सदर क्षमता बांधणी कार्यक्रम व सल्लागारिता सेवा हया योग्य ते सेवा शुल्क स्वीकारुन दिल्या जातील.